सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
आरोग्य विभाग
इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन, सोलापूर,४१३००१.
Email :- mohsolapur@gmail.com

---

जा.क्र./आअ/NUHM/७९५ दिनांक: १९ / ०५ /२०२५ E-36434

## मुलाखतीची सूचना

आरोग्य विभाग , सोलापूर महानगरपालिका अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियान ( NUHM), शहर क्षयरोग विभाग, १५ वा वित्त आयोग, राज्य शासन निधीमधून हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथील विविध १२ संवर्गातील रिक्त असलेल्या ८३ वैद्यकीय अधिकारी , स्पेशालीस्ट, व्हिजिटिंग स्पेशालीस्ट पदांची पदभरती कंत्राटी पद्धतीने करार तत्त्वावर राबविण्यात येत असून विहित पात्रता व शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेल्या इच्छुक उमेदवारांकडून दिनांक ०५/०५/२०२५ ते ०९/०५/२०२५ या कालावधीत सोलापूर महानगरपालिका आरोग्य मुख्य कार्यालय येथे विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयीन वेळेत सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात आलेले आहेत. सदर पदांकरिता मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी अंती मुलाखतीकरिता पात्र तसेच अपात्र असलेल्या उमेदवारांची यादी सोलापूर महानगरपालिकेच्या https://www.solapurcorporation.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी दिनांक २०/०५/२०२५ रोजी संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या यादीत नमूद वेळेच्या १५ मिनिटे अगोदर स्वखर्चाने स्थायी समिती सभागृह, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, सोलापूर येथे शैक्षणिक अर्हता, अनुभव तसेच इतर आवश्यक सर्व मूळ कागदपत्रे घेऊन मुलाखतीकरिता समक्ष हजर राहावे. मुलाखतीस गैरहजर राहणाऱ्या उमेदवारांचा पदभरती प्रक्रियेत विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(आशिष सुमन सुधाकरराव लोकरे)
उपायुक्त-३ (आरोग्य)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर